P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक – १४/०९/२०२३**

# पिंपरी चिंचवड आयुक्तालयात संघटित गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी “मोका पॅटर्न ” विकी मल टोळीवर मोका अंतर्गत कारवाई.

**मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री. विनय कुमार चौबे यांनी कार्यभार घेतल्यानंतर** गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२३ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील ३० संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण २४८ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. ६६७/२०२३ भादवि. ३०८, ३६४, ३९४, ३८४, ३२५, ३२३, ५०६, ३४** या गुन्हयांचे तपासामध्ये आरोपी नामे **(१) विकी रामप्रसाद मल, (टोळी प्रमुख)** वय ४२ वर्षे, रा. कैलासनगर, थेरगाव पुणे **(२) प्रसाद रोहीदास भापकर,** वय २४ वर्षे, रा. मोहन नखाते चाळ, शिवशक्ती कॉलनी, रहाटणी (३) **प्रतीक अंतवण पवार**, रा. थेरगाव पुणे यांच्ये विरुध्द **वाकड, पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीत** -दरोडा, जबरी चोरी, गंभीर दुखापत, दुखापत, पळवून नेणे, डांबुन ठेवणे, खंडणी मागणे, सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे, वाहनांची तोडफोड करणे, तसेच वाहनांची जाळपोळ करणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, दंगा करणे, **असे विकी मल टोळीवर एकुण १५ गंभीर गुन्हे** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत दाखल आहेत.

वरील टोळीमधील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवुन हिंसाचाराचा वापर करुन वर्चस्वासाठी व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अतंर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा. पोलीस सह आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे मॅडम, मा. पोलीस उप-आयुक्त (परि-०२) श्री. काकासाहेब डोळे, मा.सपोआ श्री. बाळासाहेब कोपनर (गुन्हे-१), मा.सपोआ श्री. विशाल हिरे (वाकड विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पी.सी.बी (गुन्हे शाखा), वपोनि गणेश जवादवाड (वाकड पो.स्टे), तसेच अंमलदार पो.हवा सचिन चव्हाण, पो.हवा. व्यंकप्पा कारभारी, (पी.सी.बी. गुन्हे शाखा), सपोफौ सुहास पाटोळे, पो.ना. शिमॉन चांदेकर (वाकड पो.स्टे.) यांचे पथकाने केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड आयुक्तालय